॥श्री राम समर्थ॥
॥श्री नागनाथ प्रसन्न॥
महेश गायकवाड
मो. ९७६७०४०८४३
७७४१०८४५४५
श्री शारदा रोपवाटिका
टोमॅटो, मिरची, वांगी, झेंडू, कलिंगड, खरबूज, कोबी, फ्लॉवर, शिमला मिरची, ऊस-८६०३२, २६५, पपई (७८६), पपई आइस बेरी इ.
आमच्याकडे वरील सर्व जातीची ट्रे मधील व गादी वाफ्यावरील दर्जेदार रोपे तसेच ग्रॅण्ड-जी ९ केळी रोपे शोभेची झाडे योग्य दरात मिळतील.
सोलापूर-पुणे रोडवर, मोहोळ, कृषी विज्ञान केंद्राच्या पाठीमागे, मोहोळ.

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

विकास वॉटरप्रुफिंग
घर व बंगला गळतीपासून राहील आता दूर... तेही वर्षानुवर्ष
विकास वॉटरप्रुफिंग घेऊन आले आहे नवीन टेक्नॉलॉजी, केमिकलद्वारे गॅरंटीने लिकेच थांबवली जाते.
संपर्क : M- 9067317011 / 7387644827

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक १९९ वा | शुक्रवार, दि. १३ मार्च २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

सुवर्णसंधी! सुवर्णसंधी!
श्री रामेश्वर नगर, मौजे वैराग येथे
वैराग-माढा रोड, शिवाजी नगर, शेजारी. मध्यवर्ती ठिकाणी सर्वोत्कृष्ट लोकेशनला कलेक्टर N.A. खुले प्लॉट विक्रीसाठी उपलब्ध.
1299/- प्रति स्क्वे. फूट
मौजे मार्डी, ता. उत्तर सोलापूर मार्डी-नात्रज डांबरी रोडटच तलावालगतची 11 एकर शेतजमीन विकणे आहे.
9763764949

कृषी विषयक
मिरची, सिमला मिरची, पपई, वांगी, कलिंगड, खरबूज, काकडी पिकांवरील थ्रिप्स, पांढरी माशी, कोळी, व्हायरस, चुरडा-मुरडा नियंत्रणासाठी, जलद वाढ, फुटव्यासाठी, पिकांची रोगप्रतिकारक, किड प्रतिबंधक शक्ती, उष्णतेचा ताण सहन करण्याची क्षमता वाढवण्यासाठी एकमात्र अनुभवसिध्द औषधी 'प्रतिकार', 'प्रहार', 'प्रतिबंध' महाराष्ट्रात कोठेही पाठवले जाईल.
संपर्क :
कुदरत ॲग्रो ऑरगॅनिक्स
9970115450

3000 Sq.ft. प्लॉट N.A. देणे आहे
शिनगारे सिटी सांगोला
वासुद रोड, अल्टिमेट जिम च्या पूर्वेस
संपर्क :
डी. बी. शिंदे
9579421465

# युद्धामुळे बळीराजाही चिंतेत ! खतपुरवठा खंडित, किंमती वाढणार, शेतीवर गंभीर परिणाम ?

## सोलापुरात गॅस टंचाई ?; एजन्सीसमोर सिलिंडरसाठी नागरिकांच्या लांबच लांब रांगा





**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** सध्याच्या सुरू असलेल्या युद्धामुळे शेतकऱ्यांवर पुन्हा खतटंचाईचे सावट गडद होण्याची भीती वर्तवली जात आहे. अमेरिका इस्रायल आणि इराण यांच्यातील संघर्ष तीव्र झाल्याने होरमूझ मार्ग सामुद्रधुनी जहाज वाहतुकीसाठी बंद करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

या वाढत्या तणावाचा थेट परिणाम भारतावर होण्याची शक्यता असून, विशेषतः खतांच्या आयाती समोर मोठे आव्हान उभे टाकले आहे. आगामी खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर खतपुरवठा अत्यावश्यक असल्याने ही परिस्थिती चिंताजनक मानली जात आहे. जागतिक खत व्यापारापैकी सुमारे ३३ टक्के वाहतूक होरमूझ सामुद्रधुनी मार्ग होते. युरिया, डीएपी आणि अमोनिया यासारख्या महत्त्वाच्या घटकांच्या निर्मितीसाठी हा मार्ग अत्यंत महत्त्वाचा आहे. सध्या सुरू असलेल्या संघर्षामुळे या मार्गातील वाहतूक ठप्प झाली असून, भारताच्या आयातीवर त्याचा परिणाम होऊ शकतो. भारताचे खत आयातीवरील अवलंबित्व आधीच मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे पुरवठ्यात अडथळे निर्माण झाल्यास सरकारवरील अनुदानाचा ताण वाढण्याची शक्यता आहे. तसेच कृषी निविष्ठा पुरवठा साखळी विस्कळीत होण्याचा धोका व्यक्त केला जात आहे.

इराण आणि ओमान यांच्या दरम्यान असलेला होरमूझ सामुद्रधुनी हा जागतिक व्यापारातील अत्यंत महत्त्वाचा जलमार्ग आहे. मध्यपूर्वेतून होणाऱ्या खत निर्मितीचा मोठा हिस्सा येथून जातो. त्यामुळे नायट्रोजन, फॉस्फेट आणि सल्फर यांच्या व्यापारावर ही परिणाम होण्याची शक्यता आहे. सद्यःस्थिती पाहता जिल्ह्यामध्ये खतसाठा मुबलक आहे पण येणाऱ्या काळात युद्धजन्य परिस्थिती अशीच असल्यास मात्र (पान 2 वर..)

## श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाना येथे राष्ट्रीय सुरक्षा सप्ताह संपन्न



**वेणुनगर, (कटूसत्य वृत्त):-** श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे कार्यस्थळावर दिनांक ४ मार्च ते ११ मार्च २०२६ या कालावधीत ५५ व्या राष्ट्रीय सुरक्षा सप्ताह आयोजन केलेले असून त्यानिमित्त कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांचे मार्गदर्शनाखाली कार्यकारी संचालक डी. आर. गायकवाड यांच्या उपस्थित सर्व अधिकारी, कामगार व सर्व उपस्थितांनी सुरक्षिततेची शपथ ग्रहन केली.

दरवर्षी देशात सर्व ठिकाणी औद्योगिक सुरक्षा सप्ताह साजरा करणेत येत असून औद्योगिक क्षेत्रात सुरक्षेला फार महत्व आहे. सुरक्षेचे नियम केवळ या सप्ताहापुरतेच मर्यादित न ठेवता आयुष्यभर सुरक्षानियमांचे सर्वांनी पालन करणेबाबत कामगारांना मार्गदर्शन करणेत आले. तसेच काम करीत असताना अपघात होवून स्वतःवर व आपल्यावरती अवलंबून असणाऱ्या कुटुंबावर परिणाम होवू शकतो याचे भान काम करीत असताना सर्वांनी ठेवले पाहिजे. तसेच आयुष्यभर अपघात विरहित काम करून स्वतः बरोबर आपलें कुटुंब सुरक्षित राहवे याची सर्वांनी दक्षता घेतली पाहिजे, असे मत कार्यकारी संचालक डी. आर. गायकवाड यांनी व्यक्त केले.

यांप्रसंगी सुरक्षा अधिकारी व्ही. जे. माळी यांनी सुरक्षा उपकरणांविषयी सुरक्षततेविषयी मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमाप्रसंगी कारखान्याचे वर्क्स मॅनेजर यु. के. तावरे, केन मॅनेजर ए. डी. वाघ, लेबर ॲन्ड वेलफेअर ऑफीसर बी. एस.पाटील, केनयार्ड इन्चार्ज जे. ए. सलगर, गोडावून किपर एस. व्ही. घोरपडे, हेड टाईम किपर एस.एस.जगताप, सर्व अधिकारी, कर्मचारी वर्ग व सुरक्षा विभागातील अधिकारी, कर्मचारी, ठेकेदार बहुसंख्येने उपस्थित होते.

## सोलापूर जिल्ह्यातील अकरा पैकी दहा पंचायत समितीवर भाजपाचा सभापती



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यातील अकरा पंचायत समित्यांच्या सभापती आणि उपसभापती निवडीची निवडणूक प्रक्रिया गुरूवारी पार पडली. दरम्यान, यात भारतीय जनता पक्षाने (भाजप) आपला बालेकिल्ला अधिक मजबूत केला आहे.

जिल्ह्यातील ११ पैकी १० पंचायत समितीमध्ये भाजपाचे सभापती विजयी झाले आहेत. तर केवळ एका जागेवर शिवसेनेला यश मिळाले आहे.

या निवडणुकीत भाजपने सुरुवातीपासूनच आपली रणनीती चोख ठेवली होती. उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट, बार्शी, मोहोळ, मंगळवेढा, सांगोला, पंढरपूर, माढा आणि करमाळा या १० तालुक्यांत भाजपचे सभापती विराजमान झाले आहेत. माळशिरसमध्ये मात्र शिवसेनेच्या दत्ता मगर यांनी सभापतीपद पटकावत शिवसेनेचे अस्तित्व टिकवून ठेवले आहे. या निवडीचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे महिलांना मिळालेले प्रतिनिधित्व. जिल्ह्यातील ११ पैकी ६ तालुक्यांचे नेतृत्व महिला सभापतींकडे सोपवण्यात आले आहे. उत्तर सोलापूर (तेजस्विनी बोराडे), अक्कलकोट (पान 2 वर..)

### तालुकानिहाय सभापती व उपसभापती

**उत्तर सोलापूर**
सभापती-सौ.तेजस्विनी बोराडे, भाजप
उपसभापती -सुनिल भोसले, भाजप

**दक्षिण सोलापूर**
सभापती-संदीप टेळे, भाजप
उपसभापती -सौ.वर्षा पटणे, भाजप

**अक्कलकोट**
सभापती -रश्मी हिप्परगी भाजप
उपसभापती - सागर कल्याणशेट्टी, भाजप

**बार्शी**
सभापती-मिनाक्षी रोंगे, भाजप
उपसभापती -संतोष निंबाळकर, भाजप

**मोहोळ**
सभापती -अल्लम चौधरी, भाजप
उपसभापती -उल्का पाटील, भाजप

**मंगळवेढा**
सभापती -दिपाली ताड भाजप
उपसभापती-अर्जन मल्लाळे, भाजप

**सांगोला**
सभापती -पुनम इंगवले, भाजप
उपसभापती -अजय सरगर, शिवसेना

**पंढरपूर**
सभापती-डॉ.शुभम आगवणे, भाजप
उपसभापती -प्रमोद देशमुख, राष्ट्रवादी

**माढा**
सभापती-पंडीतराव देशमुख, भाजप
उपसभापती -स्वाती गिड्डे, अपक्ष

**माळशिरस**
सभापती-दत्ता मगर, शिवसेना
उपसभापती -सोनाली पाटील, राष्ट्रवादी श.प.

**करमाळा**
सभापती -पुजा ढेरे, भाजप
उपसभापती -अजित विध्ने, राष्ट्रवादी अ.प.

## घरगुती गॅसचा अवैध वापर रोखण्यासाठी पंढरपूरमध्ये धाड



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सध्या जागतिक युद्धजन्य परिस्थितीमुळे भविष्यात इंधनाचा तुटवडा पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे महाराष्ट्र शासन व सोलापूर जिल्हा प्रशासनाने घरगुती गॅस सिलेंडरचा अवैध वापर टाळण्यासाठी विशेष पथके स्थापन केली आहेत.

जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांच्या आदेशानुसार प्रत्येक तालुक्यात पथक कार्यरत असून, पंढरपूर तालुक्यातील पथकाने तहसीलदार सचिन लंगोटे यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई केली.

पथक प्रमुख विजय तुकाराम बादल (पुरवठा निरीक्षक) व पुरवठा सहाय्यक उमेश हिंगमिरे यांनी मिळालेल्या माहितीनुसार दिनांक 11 मार्च 2026 रोजी रात्री साडेदहा वाजता सांगोला रोड, महाराज मठासमोर पंढरपूर येथे धाड टाकली. या ठिकाणी घरगुती गॅसचा अवैध वापर होत असल्याचे आढळून आले.

कारवाईदरम्यान घरगुती वापरातील आठ सिलेंडर टाक्या व व्यावसायिक पाच सिलेंडर टाक्या जप्त करण्यात आल्या. आरोपी गणेश राजू बोरीकर (वय 24, रा. पंढरपूर) याच्याविरुद्ध शहर पोलीस स्टेशन, पंढरपूर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जिल्हा प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, मागणीप्रमाणे गॅस सिलेंडर उपलब्ध केले जाणार आहेत. तरीही युद्धजन्य परिस्थिती पाहता गॅस सिलेंडरचा काटकसरीने वापर करावा, कोणत्याही प्रकारच्या अफवांवर विश्वास ठेवू नये. तसेच शासनास सहकार्य करावे.

## मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडून सोलापूरकरिता निधीची घोषणा



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहराच्या विविध प्रश्नांना वाचा फोडणाऱ्या आमदार देवेंद्र कोठे यांचा उल्लेख करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोलापूरसाठी निधीची घोषणा बुधवारी विधानसभेत केली. सोलापुरात होणाऱ्या आयटी पार्क करता जागा चिन्हांकित करण्यात आली आहे. आयटी पार्क करिता जी अर्थसंकल्पीत तरतूद आवश्यक असेल ती याचवर्षी उपलब्ध करून देण्यात येईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. आमदार देवेंद्र कोठे यांच्या मागणीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोलापूरच्या आयटी पार्कसह विविध विषयांची माहिती दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, सोलापूरच्या विमानतळावर नाईट लॉंडिंग करण्यासंदर्भात केंद्र सरकारशी सुरू असलेली बोलणी अंतिम टप्प्यात आहेत. राज्य सरकारने विमानतळांवर व्यवस्था करण्याकरिता ५०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. त्यामुळे सोलापूर विमानतळावर लवकरच नाईट लँडिंगची सोय करण्यात येईल. त्याचबरोबर सोलापूरच्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय मंजूर करण्याचा निर्णयही राज्य सरकारने घेतल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. पालकमंत्री जयकुमार गोरे यांचाही उल्लेख करत सोलापूरच्या उड्डाणपूलासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देत असल्याचेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

आमदार देवेंद्र कोठे यांनी राज्य सरकारच्या अर्थसंकल्पात झालेल्या विविध निधीच्या तरतुदींमध्ये सोलापूरचा उल्लेख नसल्याबद्दल सांगत सोलापूरला निधी देण्याची मागणी केली होती. आमदार देवेंद्र कोठे यांच्या या मागणीची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोलापूरच्या निधीबाबत केलेल्या तरतुदीची माहिती दिली. आमदार देवेंद्र कोठे यांचा विशेष उल्लेख करत सोलापूरकडे आपले विशेष लक्ष आहे हे देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आवर्जून नमूद केले.

VNP MOTORS
Multi Brand Car Sales & Services
सोलापूर मध्ये पहिले मल्टिब्रँड कार चे सुसज्ज शोरूम व वर्कशॉप
OFFER
पेट्रोल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹2949/-
डिजेल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹3649/-
AC OVERHAUL HATCHBACK RS. 2500/- SEDAN - 3000/- SUV - 3500/-
FREE PICK-UP & DROP
CNG RTO मान्यता प्राप्त CNG Retro Fitment Center
8000-92-8007
VNP MOTORS Pvt. Ltd.
GAT No. 17/2, Hyderabad Road, Next to Ford Showroom, Solapur - 9591958007

## बारावीचे प्रवेश यंदा पहिल्यांदाच ऑनलाइन; माध्यमिक शिक्षण विभागाचा निर्णय



**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्रात २०२५-२६ या वर्षासाठी पहिल्यांदाच इयत्ता अकरावीची केंद्रीकृत ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात आली. या अंतर्गत राज्यभरातील कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये १४ लाख ५० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला.

आता २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात अकरावीबरोबरच इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांचेही प्रवेश ऑनलाइन होणार आहेत. माध्यमिक शिक्षण विभागाने त्याची तयारी आता सुरू केली आहे.

राज्यात खासगी अनुदानित, अंशतः अनुदानित, खासगी स्वयंअर्थसहाय्यित अशी नऊ हजार २०० कनिष्ठ महाविद्यालये आहेत. गतवर्षी या महाविद्यालयांमध्ये गुणवत्ता यादीनुसार विद्यार्थ्यांना ऑनलाइन प्रवेश घ्यावा लागला. त्यासाठी पाच प्रवेश फेऱ्या राबविण्यात आल्या. २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात आता अकरावीसोबतच बारावीच्या विद्यार्थ्यांनाही ऑनलाइनच प्रवेश घ्यावा लागणार आहे. त्यासाठी त्यांना आधी नोंदणी करून कनिष्ठ महाविद्यालयांचा पसंतीक्रम नोंदवावा लागणार आहे. बोर्डाच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर ही प्रक्रिया सुरू होणार आहे.

### क्षमतेइतकेच प्रवेश द्यावे लागणार

अनेक खासगी स्वयंअर्थसहाय्यित व खासगी अनुदानित संस्थांकडून दरवर्षी अकरावी व बारावीच्या वर्गात क्षमतेपेक्षा जास्त प्रवेश दिले जात होते. अनेक विद्यार्थी पैसे देऊन त्यांच्या सोयीने कोणत्याही महाविद्यालयात प्रवेश घेत होते. मात्र, ते विद्यार्थी महाविद्यालयात जाण्याऐवजी खासगी कोचिंग क्लाससाठी दुसऱ्या जिल्ह्यात वर्षभर मुक्कामी जात होते. हा प्रकार आता ऑनलाइन प्रवेशामुळे कायमचा बंद होणार आहे. तसेच खासगी संस्थांना आता क्षमतेइतकेच प्रवेश द्यावे लागणार आहेत.

### आता ऑनलाइन प्रवेश घ्यावे लागतील

अनेक कनिष्ठ महाविद्यालये क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना प्रवेश देतात. बोर्डाच्या परीक्षेचे अर्ज भरल्यानंतर त्याची माहिती शालेय शिक्षण विभागाला समजते. त्यावेळी त्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, या भूमिकेतून त्या वाढीव प्रवेशाला मान्यता द्यावी लागते. हा प्रकार आता ऑनलाइन प्रवेशामुळे कायमचा बंद होणार आहे.

**- डॉ. श्रीराम पानझडे,** उपसंचालक, माध्यमिक शिक्षण, पुणे

### 'अंशतः अनुदानित'साठी बायोमेट्रिक हजेरी

अंशतः अनुदानित खासगी शाळांमधील इयत्ता अकरावी व बारावीच्या विद्यार्थ्यांची हजेरी बायोमेट्रिक पद्धतीने नोंदविणे बंधनकारक आहे. बायोमेट्रिक हजेरीवर विद्यार्थ्यांची पटसंख्या गृहीत धरली जाणार आहे. त्यावर आधारितच अनुदानाचा वाढीव टप्पा शासनाकडून या शाळांना मिळणार आहे. मात्र, इतर कनिष्ठ महाविद्यालयांसाठी बायोमेट्रिक हजेरीची अट बंधनकारक नसल्याचेही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.

## संपादकीय

# शिक्षण व्यवस्थेचा अपमान

## दहावीच्या उत्तरपत्रिका सहावीच्या विद्यार्थिनींकडून तपासल्या...

महाराष्ट्राच्या शिक्षण व्यवस्थेवर विश्वास ठेवणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांसाठी आणि पालकांसाठी दहावीची परीक्षा ही केवळ एक शैक्षणिक चाचणी नसून आयुष्याचा महत्त्वाचा टप्पा असतो. या परीक्षेच्या आधारे विद्यार्थ्यांचे पुढील शिक्षण, करिअरची दिशा आणि भविष्य ठरते. मात्र सातारा जिल्ह्यातील फलटण तालुक्यातील विडणी येथील उत्तरेश्वर हायस्कूलमध्ये घडलेली घटना ही केवळ धक्कादायकच नाही तर संपूर्ण शिक्षण व्यवस्थेच्या विश्वासार्हतेलाच तडा देणारी आहे. दहावीच्या विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका चक्क सहावीच्या विद्यार्थिनींकडून तपासून घेतल्याचा प्रकार समोर आल्याने शिक्षण क्षेत्रात संताप आणि चिंता दोन्ही वाढल्या आहेत.

दहावीची परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आयुष्यातील एक महत्त्वाचा टप्पा. या परीक्षेतील गुणांवर त्यांच्या पुढील शैक्षणिक प्रवासाचे दरवाजे उघडतात किंवा बंद होतात. त्यामुळे उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन अत्यंत जबाबदारीने, नियमांचे काटेकोर पालन करून आणि तज्ज्ञ शिक्षकांकडून केले जाणे अपेक्षित असते. मात्र या घटनेत संबंधित शिक्षकाने ही जबाबदारी अक्षरशः खेळ समजून सहावीच्या दोन विद्यार्थिनींकडून उत्तरपत्रिका तपासून घेतल्याचा आरोप होत आहे. हा प्रकार केवळ निष्काळजीपणाचा नाही तर शिक्षण व्यवस्थेचा आणि विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा घोर अपमान आहे.

या प्रकरणाचा व्हिडिओ समोर आल्याने हा प्रकार केवळ आरोपापुरता राहिलेला नाही. व्हिडिओमध्ये विद्यार्थिनी उत्तरपत्रिकांचे गठ्ठे तपासत असल्याचे दिसत असल्याने हा प्रकार किती गंभीर आहे याची कल्पना येते. जर अशा प्रकारे मूल्यमापन झाले असेल तर त्या विद्यार्थ्यांच्या गुणांवर, निकालावर आणि भविष्यातील संधींवर थेट परिणाम होऊ शकतो. एका शिक्षकाच्या बेजबाबदार वागण्यामुळे शेकडो विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात येणे ही अत्यंत चिंताजनक बाब आहे.

याहूनही गंभीर प्रश्न म्हणजे अशी वेळ का आली? शिक्षकांवर कामाचा ताण आहे का, व्यवस्थापनाकडून दबाव आहे का, की केवळ निष्काळजीपणा आणि गैरजबाबदारी आहे? कोणतेही कारण असले तरी दहावीच्या बोर्डाच्या उत्तरपत्रिका तपासण्याचे काम हे अत्यंत संवेदनशील आणि गोपनीय असते. त्यात विद्यार्थ्यांना सहभागी करून घेणे हे नियमांचे सरळ उल्लंघन आहे.

गेल्या काही काळात शिक्षण क्षेत्रात वारंवार धक्कादायक घटना घडताना दिसत आहेत. पेपरफुटीच्या घटना, परीक्षा प्रक्रियेतील त्रुटी आणि आता उत्तरपत्रिकांचे असे मूल्यमापन या सर्व घटनांमुळे विद्यार्थ्यांचा आणि पालकांचा शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास ढासळत आहे. शिक्षण ही समाजाच्या विकासाची पायाभूत व्यवस्था आहे. जर त्याच व्यवस्थेत बेफिकिरी आणि भ्रष्टाचार शिरला तर त्याचे परिणाम संपूर्ण समाजाला भोगावे लागतात.

या प्रकरणात शिक्षण विभागाने तात्काळ चौकशी सुरू केली असून अधिकाऱ्यांकडून शाळेला भेट देऊन सीसीटीव्ही फुटेज तपासले जाणार असल्याचे सांगितले जात आहे. मात्र केवळ चौकशी करून अहवाल सादर करण्यापलीकडे जाऊन कठोर कारवाई होणे गरजेचे आहे. दोषी शिक्षकावर कठोर प्रशासकीय कारवाई झाली नाही तर अशा घटना पुन्हा घडण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

त्याचबरोबर या घटनेच्या पार्श्वभूमीवर संबंधित उत्तरपत्रिकांचे पुन्हा मूल्यमापन करण्याचा विचारही करणे आवश्यक आहे. कारण जर मूल्यमापन प्रक्रियेत अनियमितता झाली असेल तर त्या विद्यार्थ्यांवर अन्याय होऊ नये याची जबाबदारी शासन आणि परीक्षा मंडळाची आहे.

या घटनेतून आणखी एक मोठा प्रश्न समोर येतो. शिक्षण व्यवस्थेतील शिस्त, जबाबदारी आणि नैतिकता कोठे हरवली आहे? शिक्षक हा समाजात आदर्श मानला जातो. विद्यार्थ्यांना मूल्ये, शिस्त आणि प्रामाणिकपणाचे धडे देणारा शिक्षक जर स्वतःच नियम धाब्यावर बसवत असेल, तर विद्यार्थ्यांना काय संदेश जातो?

म्हणूनच या प्रकरणाकडे केवळ एक वेगळी घटना म्हणून पाहून चालणार नाही. ही घटना संपूर्ण शिक्षण व्यवस्थेला जागे करणारी आहे. शिक्षण विभागाने मूल्यमापन प्रक्रियेत अधिक पारदर्शकता, कडक नियम आणि प्रभावी देखरेख यंत्रणा निर्माण करणे आवश्यक आहे. तसेच शिक्षकांची जबाबदारी आणि उत्तरदायित्व निश्चित करणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

दहावीच्या विद्यार्थ्यांचे भविष्य हे प्रयोग करण्याचे मैदान नाही. त्यांच्या मेहनतीचा, स्वप्नांचा आणि आशेचा आदर राखणे ही शिक्षण व्यवस्थेची नैतिक जबाबदारी आहे. त्यामुळे या घटनेतील दोषींवर कठोर कारवाई होणे, तसेच भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी ठोस उपाययोजना करणे. हीच आजची खरी गरज आहे. कारण शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास टिकवणे हे कोणत्याही समाजाच्या प्रगतीसाठी अत्यावश्यक असते.

पान १ वरून

## युद्धामुळे बळीराजाही चिंतेत!...

खतसाठा पुरवठ्यावर याचा परिणाम जाणवेल, असे व्यापारी वर्गातून बोलले जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी वेळीच खते घेऊन जाण्याचे व्यापारी संघटनेतर्फे बोलले जात आहे.

सोलापुरात गॅस सिलेंडरची होम डिलिव्हरी बंद झाल्यामुळे व गॅस तुटवड्यामुळे गॅस एजन्सीवर नागरिकांची सिलेंडर घेऊन नागरिकांची मोठ मोठ्या रांगा व गर्दी दिसून येत आहे.

गॅस एजन्सी मालकांकडून कडून नागरिकांना ई.के.वाय.सी करण्यासाठी नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे तर नागरिकांचे म्हणणे असे आहे की सरकारकडून असे इ.के.वाय.सी करण्यासाठी कुठलेच आव्हान झाले नसताना सुद्धा गॅस एजन्सी मालकाकडून हे मनमानी कारभार करण्यात येत आहे.तर एकीकडे मार्च महिन्याच्या 40 डिग्री कडक उन्हात नागरिकांना गॅस घेऊन रांगेत उभे राहावे लागत आहे तर दुसरीकडे गॅस संपल्यामुळे महिलांना स्वयंपाक कसा करायचा हा प्रश्न पडत आहे.

शहरातील सर्व गॅस एजन्सीवर हीच परिस्थिती दिसून येत आहे. तर येत्या काही दिवसात शहरातील खाद्यपदार्थांच्या गाड्या बंद होतील का हॉटेल्स बंद होतील का अशी शंका हॉटेल मालक व छोट्या खाद्यपदार्थ गाड्यांच्या मालकांच्या मनात निर्माण होत आहे.

## सोलापूर जिल्ह्यातील अकरा...

(रश्मी हिप्परगी), बार्शी (मिनाक्षी रोंगे), मंगळवेढा (दिपाली ताड), सांगोला (पुनम इंगवले) आणि करमाळा (पुजा ढेरे) या ठिकाणी महिलांनी बाजी मारली आहे. सोलापूरच्या ग्रामीण राजकारणात भाजपने आपले वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. महिलांना मिळालेले झुकते माप पाहता, आगामी काळात ग्रामीण विकासाच्या कामात महिलांचा सहभाग लक्षणीय ठरेल, अशी चिन्हे आहेत.

सभापती पदावर भाजपचे वर्चस्व असले तरी उपसभापती पदाच्या वाटपात वैविध्य दिसून येते. येथे भाजपने ६ जागा राखल्या आहेत, तर उर्वरित ५ जागांवर शिवसेना (१), राष्ट्रवादी शरद पवार गट (२), राष्ट्रवादी अजित पवार गट (१) आणि एका अपक्ष उमेदवाराला संधी मिळाली आहे. हे चित्र पाहता स्थानिक पातळीवर सत्तेचे विकेंद्रीकरण झाल्याचे स्पष्ट होते.

# माणूस : एक प्राणी?

माणूस हा प्राणी आहे, हे वैज्ञानिक सत्य आहे. दररोजच्या जीवनात त्याचे बोलणे, वागणे आणि राहणे पाहिले तर त्याचे प्राणीत्व स्पष्टपणे दिसून येते. खरं तर एखाद्या माणसाचे व्यक्तिमत्त्व जाणून घेणे ही अत्यंत गुंतागुंतीची बाब आहे. एखाद्याशी एखादा व्यक्ती प्रामाणिकपणे वागत असेल, तर तोच व्यक्ती दुसऱ्या कोणाचा विश्वासघात करून अप्रामाणिकही ठरतो.

कधी एखादा माणूस एक महिन्यापूर्वी 'मी पूर्णपणे नास्तिक आहे; नशीब, दैवी चमत्कार, स्वर्ग-नरक या गोष्टी मानत नाही,' असे ठामपणे सांगत असतो. परंतु त्याच्यावर संकट आल्यावर तोच व्यक्ती देवाच्या मंदिरात गाभाऱ्याभोवती फेऱ्या मारताना दिसतो. कधी एखादा माणूस आपले वजन वाढले म्हणून काही महिने आहारावर नियंत्रण ठेवतो; पण अचानक काय होते कोणास ठाऊक, त्याचे नियंत्रण सुटते आणि तो पूर्वीपेक्षा अधिक खाऊ लागतो. अति मद्यपान करणाऱ्या व्यक्तीला डॉक्टर इशारा देतात की, 'यापुढे जर तू दारू पिलीस, तर तुझ्या वाचण्याची शक्यता नाही.' तरीही तो काही दिवस स्वतःवर नियंत्रण ठेवतो आणि पुन्हा दारू पिण्यास सुरुवात करतो.

माणूस आणि त्याचे मन किंवा आत्मा हे दोन्ही भिन्न आहेत का एकच आहेत, याबाबत अनेक तत्त्वज्ञांमध्ये मतभेद आहेत. शरीरधर्मानुसार किंवा शरीराच्या गरजेनुसार माणूस वागू लागला, तर तो प्राण्यासारखा ठरतो. म्हणूनच एका तत्त्वज्ञाने म्हटले आहे.

'मी माझ्या मनाने देवाच्या कायद्याचा दास आहे; पण माझ्या पापी शरीरामुळे पापाच्या कायद्याचा गुलाम बनतो.'

आपण कुत्र्याला लालची समजतो. एखादा माणूसही तसाच हावरटपणा करू लागला, तर त्याच्या वागण्याला 'श्वानवृत्ती' असे म्हटले जाते. पैसा, अन्न आणि इतर आकर्षक गोष्टींसाठी अतिशय लोभ करणारा माणूस श्वानासारखा वागत असल्याचे म्हटले जाते. लबाडपणा हा दुर्गुण लांडग्याच्या गळ्यात टाकला गेला आहे. प्रत्यक्षात लांडग्याने कधी कोणाची फसवणूक केली असे ऐकायला मिळत नाही; तरीही हा दुर्गुण त्याच्या नावाशी जोडला गेला आहे. त्याचप्रमाणे कोल्ह्याच्या कपाळावर धूर्तपणाची उपाधी दिली गेली आहे.

वाघ आणि सिंह हे धाडसी आणि हिंस्र प्राणी मानले जातात. ते शिकार करतात, कारण अन्नसाखळीत त्यांचे स्थान वरचे आहे. ते हिंस्र असतात, पण ते स्वतःच्या पोषणासाठीच तसे वागतात. दुसऱ्यांना धाक दाखवणारे लोक जर स्वतःला 'वाघ' समजू लागले, तर ते एक धोकादायक प्रतीक ठरते.

गाढव हा प्राणी सर्वात जास्त बदनाम झाला आहे. 'गाढवपणा करू नको' असे म्हणताना आपण मूर्खपणा करू नको, असे सांगत असतो. 'गाढवाला गुळाची चव काय?' किंवा 'अडला नारायण, धरी गाढवाचे पाय' अशा म्हणींमधून कष्टाळू आणि निरुपद्रवी प्राण्याची प्रतिमा अन्यायाने मलिन केली गेली आहे. खरंच माणसात गाढवपणा असतो का?हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे.

माकडालाही तसेच बदनाम केले गेले आहे. माकड त्याच्या चपळ स्वभावामुळे सतत हालचाल करत असते. त्याच्या उड्या पाहून आपल्याला कुतूहल वाटते; पण 'माकडचाळे करू नको' ही प्रतिक्रिया एखाद्याला टोचू शकते. 'माकडछाप' ही तर अपमानास्पद शिवीच ठरते. माणसाला 'माकड' म्हणणे कितपत योग्य आहे, हे आपणच ठरवले पाहिजे.

घुबडाच्या कुरूपतेची तुलना माणसाच्या कुरूपतेशी करणे हेही निर्दयीपणाचे लक्षण आहे. तरीही काहीजण एखाद्याला 'घुबड' म्हणून हिणवतात.

बैल हा अत्यंत कष्टाळू प्राणी आहे. शेतीच्या कामात त्याने केलेल्या परिश्रमांमुळे माणसाच्या अनेक पिढ्या पोसल्या गेल्या; तरीही एखाद्या माणसाने शांतपणे काम केले, तर त्याला 'बैल' म्हणण्याची प्रवृत्ती दिसते. ती कितपत योग्य आहे ? बायकोचं म्हणणं ऐकणाऱ्या नवरोबाला बैल म्हणणं,हे तर सामंजसपणे संसार करणाऱ्या दांपत्याच्या सुखी संसारात मिठाचा खडा टाकण्याचे काम होय.

पूर्वी युद्धानंतर एखादे साम्राज्य शरण आले, तर शांततेचा संदेश देण्यासाठी कबुतरे सोडली जात असत. त्यामुळे आजही कबूतर हे शांततेचे प्रतीक मानले जाते. माणसाच्या चालण्या-बोलण्यालाही प्राणी-पक्ष्यांच्या उपमा दिल्या गेल्या आहेत. एखाद्या स्त्रीच्या मोहक चालण्याला ह्यनागिणीची चाल' म्हटले जाते. सुंदर डोळ्यांना 'मृगनयनी' अशी उपमा दिली जाते. गोड आवाज असेल, तर तिला 'कोकिळेचा स्वर' म्हटले जाते. स्त्रीच्या सौंदर्याचे वर्णन करताना हत्ती, हंस, चकोर, पोपट, मोर अशा अनेक प्राणी-पक्ष्यांचा उपयोग केला जातो.

या सर्व उपमा आणि तुलना पाहिल्या तर असे जाणवते की माणूस स्वतःला समजून घेण्यासाठी निसगार्तील इतर प्राण्यांचा आधार घेत असतो. परंतु एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे—माणूस केवळ शरीराने प्राणी असला, तरी त्याच्याकडे विचार करण्याची, विवेक वापरण्याची आणि नैतिकता जपण्याची क्षमता आहे.म्हणूनच माणसात पशुत्व असले, तरी त्याच्यात मानवतेचे तेजही आहे. खरा प्रश्न असा आहे की, माणूस आपल्या जीवनात कोणत्या बाजूला अधिक स्थान देतो—पशुत्वाला की मानवतेला?



**किशोर जाधव,** सोलापूर
मो. नं. ९९२२८८२५४१

# उत्तर सोलापूर तालुक्यातील ९ महसूल मंडळामध्ये समाधान शिबीर अभियान

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांचेकडील 18 फेब्रुवारी 2026 रोजीच्या शासन निर्णयान्वये उत्तर सोलापूर तालुक्यामधील एकूण 9 महसूल मंडळांमध्ये श्री. छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान टप्पा क्र. 1 ची अंमलबजावणी करण्याबाबतचे निर्देश शासनाने दिलेले आहेत.

शिबिरांचे नियोजन पुढीलप्रमाणे आहे.

**ग्रामीण भागातील मंडळ :-**

- तिऱ्हे व कोंडी - शनिवार, दिनांक 7 मार्च 2026
- वडाळा व मार्डी - दिनांक 28 फेब्रुवारी 2026 रोजी वडाळा येथे महाराष्ट्र राज्य विधी सेवा शिबीर घेण्यात आले असल्याने शनिवार दिनांक 14 मार्च 2026 रोजी आयोजित करण्यात आलेले वडाळा येथील शिबीर हे रद्द करण्यात येऊन सदरचे शिबीर शुक्रवार दिनांक 17 एप्रिल 2026 रोजी घेणेत येत आहे.
- बाळे व शेळगी - शुक्रवार दिनांक 10 एप्रिल 2026
- सोरेगाव व वडाळा - शुक्रवार दिनांक 17 एप्रिल 2026

**महानगरपालिका ठिकाणी असलेली मंडळ :-**

- सोलापूर - शुक्रवार 8 मे 2026
- मजरेवाडी - शुक्रवार 15 मे 2026

श्री. छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियानात विविध प्रकारचे महसूली दाखले, पुरवठा कार्यालयाशी संबंधित दाखले, इतर विभागांशी संबंधित योजना व दाखले यांची सुविधा सदर शिबीरात तात्काळ पुरवली जाणार आहे. त्या अनुषंगाने आपण आपल्या कागदपत्रांची पुर्तता संबंधित विभागात करावी.

तसेच तालुका प्रशासनाकडून जाहीर आवाहन करण्यात येते की, सर्व नागरिक, शेतकरी व विद्यार्थ्यांनी संबंधित विभाग व तहसिल कार्यालयाशी संपर्क साधावा असे तहसिलदार उत्तर सोलापूर निलेश पाटील यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# पीसीयू येथे टेक युअर चान्स - टेक्निऑन २०२६ महोत्सव संपन्न

**पिंपरी, पुणे (कटूसत्य वृत्त):-** विद्यार्थ्यांनी केवळ सैद्धांतिक शिक्षणापुरते मर्यादित राहू नये. अनुभव आधारित नव उपक्रम, नव संकल्पना सादर केल्या पाहिजेत यासाठी पिंपरी चिंचवड विद्यापीठाच्या वतीने (पीसीयू) सुरू करण्यात आलेला

'टेक युअर चान्स - टेक्निऑन २०२६" हा महोत्सव म्हणजे एक सर्वसमावेशक, मार्गदर्शक, उत्कृष्ट व्यासपीठ आहे. यामध्ये प्रयोग करा, स्पर्धा करा, नव कल्पना साकार करा आणि नेतृत्व घ्या हा मुख्य उद्देश आहे. आपली आवड आणि नवीन कल्पना प्रत्यक्ष कृती मध्ये ही एक मोठी संधी आहे, असे प्रतिपादन पीसीयूचे कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे यांनी केले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या पिंपरी चिंचवड विद्यापीठ (पीसीयू) साते, वडगाव मावळ येथे स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी (एसओइटी) तर्फे "टेक युअर चान्स - टेक्निऑन २०२६" तांत्रिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी कुलसचिव डॉ. अनिल महेश्वरी, प्र-कुलगुरू डॉ. सुदीप थेपडे, आऊटरीच अँड ॲडमिशन्स संचालक डॉ. रामदास बिरादार, स्टुडंट डेव्हलपमेंट अँड वेलफेअर संचालक डॉ. अंजू बाला, इंडस्ट्री-




इन्स्टिट्यूट इंटरॲक्शन सेलचे संचालक डॉ. प्रणव चरखा आदी उपस्थित होते.

टेक्निऑन २०२६ मध्ये संगणक प्रोग्रामिंग प्रकल्प, मूलभूत विज्ञान, अभियांत्रिकी मॉडेल्स, हार्ड मॉडेल सादरीकरण, पोस्टर प्रेझेंटेशन्स अशा विविध तांत्रिक स्पर्धा व प्रदर्शन आयोजित केले होते. यामध्ये नव कल्पना, कौशल्य, स्पर्धात्मक, सर्जनशीलता, विश्लेषणात्मक विचारसरणी आणि वास्तव जीवनातील समस्यांवर आधारित उपाय असलेले प्रकल्प विद्यार्थ्यांनी सादर केले. त्यापैकी 'रोबो हर्डलेक्स मिशन डिझाइन अँड प्लॉट' यामधील सहभागी विद्यार्थ्यांनी रोबोट डिझाइन काढणे, तयार करणे आणि ते नियंत्रित करण्याचे काम करणे

असे प्रकल्प सादर केले. महोत्सवाचा संदेश विद्यार्थ्यांना "आपल्या संधी घ्या" - प्रयोग करा, स्पर्धा करा, नवकल्पना करा आणि नेतृत्व करा असा होता.

टेक्निऑन २०२६ मध्ये विविध तांत्रिक क्षेत्रातील ७३० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. एकूण २१० विद्यार्थ्यांनी संगणक प्रोजेक्ट्स, १५५ विद्यार्थ्यांनी पोस्टर प्रेझेंटेशन, १२५ विद्यार्थ्यांनी हार्ड मॉडेल प्रोजेक्ट्स आणि २४० विद्यार्थ्यांनी बेसिक सायन्स आणि इंजिनिअरिंग प्रोजेक्ट्स प्रदर्शित केले. विद्यार्थ्यांची रचनात्मकता, विश्लेषणात्मक विचार करण्याची क्षमता विकसित होते असे डॉ. प्रा. रामदास बिरादार यांनी सांगितले.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयू कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी आयोजक, समन्वयक आणि मार्गदर्शकांचे कौतुक केले.

# 'अंकुर' संस्थेतर्फे कर्तृत्ववान महिलांचा गौरव

## 'महिलांचे संघटनच राष्ट्राची खरी शक्ती': प्रणिता कांबळे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून 'अंकुर बहुउद्देशीय सामाजिक संस्था, सोलापूर' यांच्या वतीने शहरातील विविध क्षेत्रांत मोलाचे योगदान देणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा सन्मान सोहळा उत्साहात पार पडला. याप्रसंगी सन्मानमूर्तींनी उपस्थित महिलांना स्वबळावर प्रगती करण्याचा कानमंत्र दिला.

कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी व सोलापूर जिल्ह्याच्या बार्टी चे प्रकल्प अधिकारी प्रणिता कांबळे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, "केवळ कुटुंबाची जबाबदारी न सांभाळता आजची महिला प्रशासकीय, वैद्यकीय आणि तांत्रिक अशा प्रत्येक क्षेत्रात स्वतःची ओळख निर्माण करत आहे. महिलांचे संघटन आणि आत्मबल हीच राष्ट्राच्या प्रगतीची खरी गुरुकिल्ली आहे."



या सोहळ्यात विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. यामध्ये ॲड. प्रियंका राजन गोरंटी, डॉ. अरुणा भिसे, सुप्रिया मोहोळकर, पोलीस अर्चना जामदार, कल्याणी कांबळे, संगीता पाटील, अर्चना नारायणकर, निकिता घनाते, पोलीस ज्योती बेटकर, निलिमा वळसंगकर, डॉ. तेजस्विनी कांबळे, आम्रपाली लोखंडे, यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

संस्थेचे अध्यक्ष किरण खरटमल यांनी प्रास्ताविकात सामाजिक कार्यात महिलांच्या सहभागाचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाच्या यशस्वी नियोजनासाठी उपाध्यक्ष अश्विनी लोंढे, सचिव चंद्रकांत जगताप, सहसचिव अरुणा खरटमल आणि प्रियांका जाधव यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच प्रथमेश बुरुडकर, नितीश वेदपाठक, आनंद पुजारी, प्रसाद सज्जन, बाबासाहेब सदाफुले,मयूरेश भोईटे, प्रथमेश कासार आदी उपस्थित होते.

# आरोग्य क्षेत्रातील नोकरी केवळ उपजीविकेचे साधन नसून मानव सेवेची संधी- हिवरकर-पाटील

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** नातेपुते व परिसरातील ग्रामीण भागातील राहणाऱ्या मुला मुलींसाठी नातेपुते ठिकाणी राजगड नॉलेज सिटी अलाईड अँड हेल्थकेअर इन्स्टिट्यूटमध्ये अकरावी व बारावी च्या विद्यार्थ्यांसाठी राजगड नॉलेज सिटी च्या माध्यमातून आरोग्य क्षेत्रातील नोकरी केवळ उपजीविकेचे साधन नसून मानवसेवेची संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आले आसल्याचे मत राजगड नॉलेज सिटीचे चेअरमन राजकुमार हिवरकर पाटील यांनी माहिती देताना व्यक्त केले.विद्यार्थ्यांना गुणवत्ता पूर्ण व आधुनिक शिक्षण मिळावे या उद्देशाने राजगड नॉलेज सिटी अँड हेल्थकेअर इन्स्टिट्यूट च्या माध्यमातून वैद्यकीय क्षेत्रातील रेडिओलॉजी टेक्निशियन, एक्स-रे, ब्लड बँक लॅब टेक्निशियन, ईसीजी टेक्नॉलॉजी, डायलेसिस असे विविध कोर्सेस पुणे पंढरपूर पालखी महामार्गावरील शंकरराव कॉम्प्लेक्स येथे असलेल्या या संस्थेत इयत्ता १० वी, 12 वी कला वाणिज्य व विज्ञान शाखांचे शिक्षण उपलब्ध करून देण्यात येत आहे संस्थेला नवी दिल्ली येथील सेंट्रल बोर्ड ऑफ ओपन स्कूलिंग अँड एक्झामिनेशन ची मान्यता मिळालेली असून विद्यार्थ्यांना नेहमीच शिक्षणाबरोबरच स्पर्धा परीक्षा ची तयारी येथे करून दिली जाणार असल्याचेही हिवरकर पाटील यांनी सांगितले. या स्पर्धा परीक्षांसाठी स्वतंत्र मार्गदर्शन सुविधा उपलब्ध असल्याने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी याचा मोठा फायदा होणार आहे. नातेपुते व परिसरातील विद्यार्थ्यांना या कोर्सेस साठी पुणे, सातारा, बारामती, फलटण, पंढरपूर, सोलापूर, कोल्हापूर, सांगली, मिरज अशा अनेक वेगवेगळ्या ठिकाणी जावे लागत होते. मात्र नातेपुते या ठिकाणी राजगड नॉलेज सिटी अलाईड अँड हेल्थकेअर इन्स्टिट्यूट च्या माध्यमातून आरोग्य क्षेत्रात करिअर घडवण्याची सुवर्णसंधी मिळाली



असल्याने विद्यार्थ्यांची बाहेर जाण्याची पळापळी थांबणार असून विद्यार्थ्यांना आरोग्य क्षेत्रात करिअरच्या अफाट सुवर्णसंधी उपलब्ध होणार आहेत. सरकारी रुग्णालय, खाजगी रुग्णालय, रेल्वे, महानगरपालिकेत, आरोग्य क्षेत्रात प्रशिक्षणातून नोकरीची संधी उत्तम पगार, समाजात मानसन्मान नोकरीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मिळणार आहे.आर्थिक दृष्ट्या दुर्बल व शिक्षणात खंड पडलेल्या विद्यार्थ्यांना पुन्हा मुख्य प्रवाहात आणण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा ड्रीम प्रोजेक्ट साक्षात उतरवण्यासाठी संस्थेमार्फत प्रयत्न केला जात आहे. यासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू असून इच्छुक विद्यार्थ्यांनी व पालकांनी संपर्क साधण्याचे आवाहन राजगड नॉलेज सिटी व राजगड विद्यामंदिरचे चेअरमन राजकुमार हिवरकर पाटील यांनी केले आहे.

# पंढरपूरात 14 मार्चला राष्ट्रीय लोअदालतीचे आयोजन

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण आणि उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशावरून पंढपूरात दि.14 मार्च 2026 रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले असून या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये जास्तीत जास्त पक्षकारांनी प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यासाठी या लोक अदालतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन तालुका विधी सेवा समिती अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश ओं. रा. देशमुख यांनी केले आहे.

या लोकअदालतीमध्ये फौजदारी तडजोडपात्र प्रकरणे, बँक वसुली, कलम 138 एनआय ॲक्टची प्रकरणे, कामगार वाद प्रकरणे, वीज व पाणी यांच्या देयकाबाबतची प्रकरणे, वैवाहीक वादाबाबतची प्रकरणे ठेवण्यात येणार आहेत. तसेच भूसंपान बाबतची प्रकरणे, बँक, सहकारी बँक, सहकारी पतसंस्था यांच्या वसुलीच्या दरखास्त, बँक लवाद दरखास्त इत्यादी (प्रलंबित व दाखलपूर्व) प्रकरणे ठेवण्यात येणार आहेत. या लोकअदालतीमध्ये नगरपालिका यांच्या कर आकारणी व गाळेधारक यांची प्रकरणे तसेच ग्रामपंचायतीमधील घरपट्टी व पाणीपट्टी यांच्या थकीत बिलाची दाखलपूर्व प्रकरणे ठेवण्यात येणार आहे.

ज्या पक्षकारांना लोकअदालतमध्ये प्रत्यक्षरीत्या सहभागी होता येणार नाही त्यांच्यासाठी आभासी पध्दतीने उपस्थिती राहण्याकरीता ऑनलाईन माध्यमाचा वापर केला जाणार आहे. या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये पंढरपूर तालुक्यातील जास्तीत जास्त पक्षकारांनी आपापली प्रकरणे तडजोडीने मिटवून घ्यावेत, असे आवाहनही तालुका विधी सेवा समिती अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश ओं. रा. देशमुख यांनी केले आहे.

**CHANGE IN NAME**

My old name was **Waid Allauddin Tamboli**, but I have changed my new name to **Vahid Allauddin Tamboli**. Although the person with both names is the same, from today onwards I should be known by my new name.

**CHANGE IN NAME**

My old name was **Munera Wahid Tamboli,** but I have changed my new name to **Khatunbi Vahid Tamboli.** Although the person with both names is the same, I should be known by my new name from today onwards.

## वात्रटिका

### गॅस तुटवडा

यांच्यावर की त्यांच्यावर
विश्वास कोणावर ठेवावा...
आता गॅस संपला घरातला
स्वयंपाक कसा करावा...
घरी स्वयंपाक नाही आणि
हॉटेलात जेवण मिळेना...
चिंता नको, सुरळीत होईल,
अशा शब्दाने पोट भरेना...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.

Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# उत्तर सोलापूरचे सभापतिपद शहाजी पवार गटाकडे तर उपसभापतिपद यशवंत माने गटाकडे



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** उत्तर सोलापूर पंचायत समितीच्या सभापतिपदी अपेक्षेप्रमाणे मार्डी गणातून निवडून आलेल्या तेजस्विनी अमोल बोराडे यांची, तर उपसभापतिपदी नान्नज गणातून निवडून आलेले भाजपचे कट्टर कार्यकर्ते सुनील भोसले यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

बोराडे या भाजपचे प्रांतिक सदस्य शहाजी पवार समर्थक असून भोसले हे माजी आमदार यशवंत माने गटाचे आहेत, त्यामुळे तालुक्यातील सर्वात प्रबळ असलेला माजी आमदार दिलीप माने गट पंचायत समितीच्या सत्तेबाहेर राहिला आहे.

उत्तर सोलापूर पंचायत समितीचे सभापतिपद हे अनुसूचित जाती महिला प्रवर्गासाठी राखीव होते. त्या प्रवर्गाच्या तेजस्विनी बोराडे ह्या मार्डी गणातून निवडून आलेल्या एकमेव सदस्या होत्या, त्यामुळे सभापतिपदी बोराडे यांची निवड निश्चित होती. मात्र, उपसभातिपदाबाबत प्रचंड उत्सुकता होती.

पंचायत समितीच्या निवडणुकीत भाजपचे चार, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसचा प्रत्येकी एक सदस्य निवडून आला आहे. भाजपकडे बहुमत होते. सभापतिपदाची मार्डी गणाची जागा ही प्रांतिक सदस्य शहाजी पवार गटाकडे जागा वाटपात गेली होती. तेथून तेजस्विनी बोराडे निवडून आल्या आहेत.

नान्नज आणि बीबी दारफळ हे दोन्ही गण माजी आमदार यशवंत माने गटाकडे होते. वडाळा, कोंडी, तिऱ्हे हे तीन गट माजी आमदार दिलीप माने गटाकडे होते. मात्र, वडाळ्यातून राष्ट्रवादी काँग्रेसच्या वैशाली शिलवंत, कोंडीतून शिवसेनेचे धनाजी भोसले तर तिऱ्हे गणातून ऋतुजा बंडगर निवडून आल्या आहेत, त्यामुळे माजी आमदार दिलीप माने गटाकडे एकच जागा होती.

उपसभापतिपदासाठी नान्नजचे सुनील भोसले, बी बी दारफळच्या सुनीता बारसकर आणि पाथरीच्या ऋतुजा बंडगर यांची नावे चर्चेत होती. मात्र, यशवंत माने यांनी भोसले यांच्या नावाला पसंती दिली, त्यामुळे बारसकर यांचे नाव मागे पडले. सभापतिपदी बोराडे, तर उपसभातिपदी भोसले यांची बिनविरोध निवड झाल्यामुळे माजी आमदार दिलीप माने गट सत्तेबाहेर राहिला आहे.

### अडीच वर्षानंतर दिलीप माने गटाला संधी ?

सभापतिपदाचे आरक्षण चक्राकर पद्धतीनुसार अडीच वर्षानंतर बदलणार आहे, त्यामुळे अडीच वर्षानंतर ओबीसीसाठी सभापतिपद राखीव राहू शकते, त्या जागेवर माजी आमदार दिलीप माने गटाच्या ऋतुजा बंडगर यांना संधी मिळू शकते, त्याही वेळी उपसभापती कोण होणार, याची उत्सुकता असणार आहे.

# भव्य नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** बालाजी अमाईन्स लि., रोटरी क्लब ऑफ सोलापूर, आणि शंकरशेठ साबळे नेत्र रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने, सोलापूर इंडस्ट्रीज असोसिएशन, चिंचोळी MIDC येथे भव्य नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले. यामध्ये ४५७ लाभार्थींनी तपासणी करून घेतली. त्यामध्ये १३६ जणांना मोतीबिंदू शस्त्रक्रियेची आवश्यकता असून १९० जणांना चष्मे वाटप करण्यात आले. या शिबिराचा उद्देश नागरिकांना नेत्र आरोग्याबाबत जागरूक करणे तसेच गरजू रुग्णांना मोफत नेत्र तपासणी व आवश्यकतेनुसार चष्मा आणि मोतीबिंदू शस्त्रक्रियेची सुविधा उपलब्ध करून देणे असा होता.

बालाजी अमाईन्स तर्फे उरफ फंडातून यासाठी मदतनिधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. शिबिराचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. रोटरी क्लब ऑफ सोलापूरच्या अध्यक्षा रोटे.



धनश्री केळकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले आणि रोटरी क्लबच्या कायार्ची माहिती दिली. प्रकल्प प्रमुख रोटे. मितेश पंचमिया यांनी प्रास्ताविकातून शिबिराचा उद्देश सांगितला. तसेच या शिबिरानंतर तामलवाडी भागात आणि रळ कर्मचाऱ्यांसाठी देखील असेच नेत्र तपासणी शिबीर आयोजीत करण्यात येत असल्याची माहिती दिली.

यानंतर बालाजी अमाईन्स लि. चे उरफचे श्री. अनिल विपत यांनी कंपनीच्या सामाजिक उपक्रमांची माहिती देत या प्रकल्पाबाबत मार्गदर्शन केले. डॉ. सुधीर सुधाळ (शंकरशेठ साबळे नेत्र रुग्णालय) यांनी नेत्र आरोग्याचे महत्त्व आणि H. V. देसाई नेत्र रुग्णालय तसेच शंकरशेठ साबळे नेत्र रुग्णालयाची माहिती दिली.

कार्यक्रमास सोलापूर इंडस्ट्रीज असोसिएशनचे श्री. गणेश सुत्रावे यांनी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमात प्रमुख उपस्थिती असलेले रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ चे नियुक्त प्रांतपाल DGE जयेशभाई पटेल यांनी आपल्या मनोगतातून समाजहितासाठी रोटरी क्लबकडून राबविण्यात येणाऱ्या सेवा प्रकल्पांची माहिती दिली. तसेच येत्या काळात रोटरी डिस्ट्रिक्ट कडून जे मेगा प्रोजेक्ट घेण्यात येणार आहेत त्याविषयी संवाद साधला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे बालाजी अमाईन्स लि. चे पूर्णवेळ संचालक श्री. राजेश्वर रेड्डी यांनी आपल्या मनोगतातून सामाजिक जबाबदारीच्या भावनेतून अशा उपक्रमांना कंपनीचा कायम पाठिंबा राहील आणि अनेक सेवाभावी संस्था एकत्र येऊन असे मोठे प्रकल्प नक्कीच यशस्वी करू शकतात असे सांगितले.

कार्यक्रमाचा समारोप बालाजी अमाईन्स लि. चे उरफ प्रतिनिधी श्री. दत्तप्रसाद सांजेकर यांच्या आभार प्रदर्शनाने झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्री. सचिन सुतार यांनी केले. या शिबिराच्या माध्यमातून मोठ्या संख्येने नागरिकांना नेत्र तपासणी व आवश्यक उपचारांची सुविधा उपलब्ध होणार असून समाजातील गरजू घटकांसाठी हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

या शिबिराच्या यशस्वितेसाठी रोटरी क्लब ऑफ सोलापूरचे सदस्य व बालाजी अमाईन्स लि चे अधिकारी निलेश फोफलिया, आशिष मेहता, सौ. पारूल पटेल, सुनील माहेश्वरी, शिवाजी उपरे, संजय मडूर, सचिन मोरे ,अमोल गुंड , बसवराज अंटद, गजानन काळे,गणेश नवगिरे,आदित्य जैन अमोग पांडे,संतोष कणेकर, डॉ. राजीव मोहोळकर, मकरंद बसवंती, विशाल वर्मा, बी. एस. मुंदडा यांनी विशेष सहकार्य केले.

# मध्यपूर्वेतील तणावाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना इलेक्ट्रिक चुली उपलब्ध करून देण्याची मागणी



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** मध्यपूर्वेतील इराण-इस्रायल संघर्षामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर इंधन टंचाई निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात असताना, त्याचा परिणाम भारतातील पेट्रोल, डिझेल व स्वयंपाक गॅसच्या उपलब्धतेवर होऊ शकतो. या पार्श्वभूमीवर नागरिकांना पर्यायी व्यवस्था म्हणून मोफत किंवा अनुदानित इलेक्ट्रिक चुली उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे.

याबाबतचे निवेदन रयत क्रांती संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी, सोलापूर यांना देण्यात आले. संघटनेचे जिल्हाध्यक्ष नामदेव यशवंत पवार यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सध्या मध्यपूर्वेत इराण आणि इस्रायल यांच्यात वाढत चाललेल्या तणावपूर्ण परिस्थितीमुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठी अस्थिरता निर्माण झाली आहे. या संघर्षात अमेरिकेचा इस्रायलला पाठिंबा असल्याने युद्धाचा विस्तार होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मध्यपूर्वेतील हा प्रदेश जगातील कच्चे तेल आणि नैसर्गिक वायू पुरवठ्याचा महत्त्वाचा केंद्रबिंदू मानला जातो. विशेषतः होर्मुझ सामुद्रधुनीमार्गे मोठ्या प्रमाणावर तेल आणि वायूची वाहतूक होत असते. या मार्गात अडथळे निर्माण झाल्यास जागतिक बाजारपेठेत कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी वाढ होण्याची शक्यता आहे.

भारत हा देश मोठ्या प्रमाणात कच्चे तेल आणि नैसर्गिक वायू परदेशातून आयात करतो. त्यामुळे मध्यपूर्वेतील तणावाचा परिणाम भारतातील पेट्रोल, डिझेल तसेच एलपीजी गॅसच्या उपलब्धतेवर आणि किमतीवर होण्याची शक्यता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. भविष्यात गॅस टंचाई निर्माण झाल्यास सामान्य नागरिक, विशेषतः गरीब व मध्यमवर्गीय कुटुंबांना स्वयंपाकासाठी अडचणींचा सामना करावा लागू शकतो.

या पार्श्वभूमीवर शासनाने नागरिकांसाठी पर्यायी उपाययोजना म्हणून ग्रामीण तसेच शहरी भागातील कुटुंबांना शासनामार्फत मोफत किंवा अनुदानित दरात इलेक्ट्रिक चुली (इंडक्शन/ हॉट प्लेट) उपलब्ध करून देण्याची योजना राबवावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या योजनेमुळे स्वयंपाकासाठी गॅसवरील अवलंबित्व कमी होईल, संभाव्य गॅस टंचाईच्या काळात नागरिकांना पर्यायी सुविधा उपलब्ध होतील तसेच गरीब व मध्यमवर्गीय कुटुंबांना आर्थिक दिलासा मिळेल, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

नागरिकांच्या हिताचा विचार करून शासनाने या मागणीवर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा रयत क्रांती संघटनेच्या वतीने व्यक्त करण्यात आली आहे. या प्रसंगी याप्रसंगी उपस्थिती राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सोशल मीडिया विभागाचे अध्यक्ष शहर वैभव गंगणे अमोल पाटील , तुकाराम साठे रोहित पाटील रेवा सुतार सचिन चलवादी संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# रंगभवन येथील कीर्तीस्तंभ परिसरात प्रकाश, सुरक्षा व स्वच्छतेसाठी उपाययोजना- महापौर कोंड्याल

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** रंगभवन येथील कीर्तीस्तंभ परिसरात लाईट, सुरक्षा व स्वच्छतेच्या समस्या निर्माण झाल्याच्या पार्श्वभूमीवर सोलापूर महानगरपालिकेचे महापौर श्री. विनायक कोंड्याल यांनी आज प्रत्यक्ष भेट देऊन परिसराची पाहणी केली.यावेळी भारतीय जैन संघटना, अतिशय क्षेत्र 1008 चंद्रप्रभू दिगंबर जैन मंदिर कुमठे, सकल जैन समाज, जैन सोशल ग्रुप, बाहुबली मंदिर विजापूर रोड, नमोकार सामाजिक संघटना, आस्था रोटी बँक, आचार्य शांतिसागर युवा संघटना, ज्ञानदीप महिला मंडळ, जैन कासार समाज, जैन कासार विकास प्रतिष्ठान आदी सामाजिक संघटनांच्या प्रतिनिधींनी महापौरांकडे विविध मागण्या मांडल्या.

रंगभवन येथील कीर्तीस्तंभ परिसरात कायमस्वरूपी प्रकाश



व्यवस्था करण्यात यावी, सुरक्षा रक्षक नेमण्यात यावा, नियमित स्वच्छता ठेवण्यात यावी तसेच बंद पडलेले सीसीटीव्ही कॅमेरे तातडीने सुरू करण्यात यावेत अशी मागणी यावेळी करण्यात आली. काहीजण येथे येऊन वाढदिवस साजरे करत असल्याने त्यावर कायमस्वरूपी बंदी घालावी, अशीही मागणी सामाजिक संघटनांनी केली.महापौर विनायक कोंड्याल यांनी या सर्व मागण्यांची दखल घेत संबंधित विभागांना आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात येतील तसेच रंगभवन येथील कीर्तीस्तंभ परिसर स्वच्छ, सुरक्षित व सुस्थितीत ठेवण्यासाठी महानगरपालिका सकारात्मक पावले उचलेल असे आश्वासन यावेळी दिले.यावेळी श्याम पाटील (राज्य कार्यकारणी सदस्य, भारतीय जैन संघटना), सुनील गांधी (अध्यक्ष, आदिनाथ जैन मंदिर ट्रस्ट), अभिनंदन विभूते (विभागीय उपाध्यक्ष, भारतीय जैन संघटना), परागभाई गांधी (संचालक, सिद्धोहम ज्वेलर्स), आनंद तालीकोटी (आस्था रोटी बँक), प्रा. मनीष शहा, देशभूषण वसाळे (जिल्हाध्यक्ष, भारतीय जैन संघटना), पंडित माणिक उपाध्ये (नमोकार सामाजिक संघटना), वालचंद पाटील (सचिव, जैन मंदिर कुमठे), प्रा. धन्यकुमार बिराजदार (संचालक, कासार सोसायटी), विक्रांत बशेट्टी हिराचंद कासार (सदस्य, भारतीय जैन संघटना), आशुतोष शहा, स्नेहा वनकुद्रे, प्रिया पाटील, मंगल पांढरे, श्रद्धा शहा, सुहास शहा कोठारी, अरविंद शहा (संचालक, आदिनाथ जैन मंदिर ट्रस्ट) आदी मान्यवर उपस्थित होते.

# एम. के. फाउंडेशनचे महादेव कोगनुरे यांनी बोरूटे कुटुंबीयांची घेतली भेट



**दक्षिण सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** दक्षिण सोलापूर ता. आहेरवाडी येथील इरेश भागण्णा बोरूटे यांच्या घराला मंगळवारी सकाळी अचानक शॉक सर्किटमुळे भीषण आग लागून संपूर्ण घर जळून खाक झाले. या आगीत सोने-चांदी, रोख रक्कम व संसारोपयोगी साहित्य जळून सुमारे दीड ते दोन लाखांचे नुकसान झाले आहे. कष्टाने उभा केलेला संसार काही क्षणात राख झाल्याने बोरूटे कुटुंब मोठ्या संकटात सापडले असून सध्या हे कुटुंब उघड्यावर आले आहे. सुदैवाने घरातील सर्व सदस्य वेळेत बाहेर पडल्यामुळे कोणतीही जीवितहानी झाली नाही.

घटनेची माहिती मिळताच अतिथी प्युअर व्हेज, कुंभारी तथा एम. के. फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जनसेवक महादेव कोगनुरे यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत बोरूटे कुटुंबीयांची भेट घेतली, त्यांना धीर दिला आणि मदतीचा हात पुढे केला.

बोरूटे कुटुंब अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत मोलमजुरी करून उदरनिर्वाह करणारे कुटुंब आहे. त्यांच्या आयुष्यात अचानक आलेल्या या कठीण प्रसंगी समाजातील दानशूर व्यक्तींनी पुढे येऊन या कुटुंबाला सढळ हाताने सहकार्य करावे,अशी भावनिक व मनापासून विनंती जनसेवक महादेव कोगनुरे यांनी केली.

# सोलापूर जिल्हा कारागृहात बंद्यांसाठी 'स्ट्रेस फ्री : तणावमुक्त जीवन' कार्यशाळा संपन्न

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे सुहास बारके यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच विशेष कारागृह महानिरीक्षक (मुख्यालय) योगेश देसाई व कारागृह उपमहानिरीक्षक (पश्चिम विभाग) सुनिल डमाळ यांच्या प्रेरणेने सोलापूर जिल्हा कारागृहात बंदी बांधवांसाठी 'स्ट्रेस फ्री : तणावमुक्त जीवन' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

ही कार्यशाळा तंत्रज्ञान फाऊंडेशन – Happy Thoughts, सोलापूर या सामाजिक सेवाभावी संस्थेमार्फत घेण्यात आली. कार्यशाळेदरम्यान संस्थेचे अध्यक्ष सरश्री यांचा संदेश व सकारात्मक विचारांचे महत्त्व व्हिडिओद्वारे दाखविण्यात आले.

अरविंद भांडे यांनी बंदी बांधवांना नकारात्मक विचारांपासून दूर राहण्याचे महत्त्व सांगून सकारात्मक विचारांच्या माध्यमातून जीवन समृद्ध करण्याचे मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास कारागृह अधीक्षक सुशिल कुंभार, वरिष्ठ तुरुंगाधिकारी बी. एस. खळबुटे, तुरुंगाधिकारी विठ्ठल शिंदे, निलेश गायकवाड तसेच तंत्रज्ञान फाऊंडेशनचे गणेश इरावती, परशुराम राफेली, इरप्पा लातुरे, रघुनाथ उडता व बंदी बांधव उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन कारागृह शिक्षक अंगद गव्हाणे यांनी केले.

# जिल्हा परिषदेत बंधुभावाचा इफ्तार सोहळा : मराठा सेवा संघाचा अनोखा उपक्रम



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पवित्र रमजान महिन्याच्या निमित्ताने मराठा सेवा संघाच्या वतीने सोलापूर जिल्हा परिषदेमध्ये मुस्लिम कर्मचारी बांधवांसाठी रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण आणि आपुलकीच्या वातावरणात पार पडला.

या इफ्तार सोहळ्यास सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन) स्मिता पाटील, जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रसाद मिरकले, शिक्षण अधिकारी प्राथमिक कादर शेख, कार्यकारी अभियंता बांधकाम नरेंद्र खराडे, संतोष कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थित होती.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, 'धर्म, जात आणि पंथ वेगवेगळे असले तरी आपण सर्वजण एकाच कुटुंबाचा भाग आहोत. अशा कार्यक्रमांमुळे समाजात बंधुभाव, आपुलकी आणि सामाजिक ऐक्य अधिक दृढ होते. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही मराठा सेवा संघाच्या वतीने इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले असून हा उपक्रम खरोखरच कौतुकास्पद आहे.'

या कार्यक्रमाच्या माध्यमातून सामाजिक सलोखा, परस्पर सन्मान आणि एकात्मतेचा सुंदर संदेश देण्यात आला. इफ्तारच्या वेळी सर्व अधिकारी व कर्मचारी एकत्र येऊन रमजान महिन्याच्या पवित्रतेचा अनुभव घेतला.

यावेळी मराठा सेवा संघाचे अध्यक्ष अविनाश गोडसे, सचिन साळुंखे, जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष राजेश देशपांडे, दिनेश बनसोडे, प्रदीप सगट, संतोष माने, निलेश देशमुख यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुहास चेळेकर, सुधाकर माने-देशमुख, सुर्यकांत मोहिते, सचिन चव्हाण, चेतन भोसले, आनंद साठे, विकास भांगे, रणजित गव्हाणे, संतोष शिंदे, अनिल पाटील, वासुदेव घाडगे, विशाल घोगरे, अभिजीत निचळ, संतोष सातपुते, भूषण काळे, उमेश खंडागळे, प्रकाश शेंडगे, मनोज साठे, गोपाल शिंदे, संजय पाटील, रविंद्र शेंडगे, महेंद्र माने, सुभाष तनमोर, शशि साळुंखे, विठ्ठल मलपे, संतोष शेळके, नितिन पाटील आदी मराठा सेवा संघाचे पदाधिकारी उपस्थित होते.

तसेच कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ममता काशेट्टी, वैशाली रंपुरे, श्रीमती शशिकला सुतार, गौरी कदम, ज्योती माळी, ज्योत्सना साठे, कृष्णा अधटराव, सिद्धेश्वर जक्का, शुभम खरे, सत्यजित कमळे, रोहित शिंदे, सागर शेंडगे आदींनी विशेष परिश्रम घेतले.

या सर्वांच्या सहकायार्मुळे जिल्हा परिषद सोलापूर येथे आयोजित केलेला इफ्तार सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडत सामाजिक ऐक्य आणि बंधुभावाचा सुंदर संदेश देणारा ठरला.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महताब शेख यांनी तर आभार अविनाश गोडसे यांनी मानले.

# दाजी पेठ येथील आप्पा गणपती प्रतिष्ठानला राज्य शासनाचा जिल्ह्यात द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** दाजी पेठ येथील आप्पा गणपती प्रतिष्ठान या मंडळास राज्य शासनाच्या वतीने सोलापूर जिल्ह्यात द्वितीय क्रमांकाचा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. सामाजिक, सांस्कृतिक तसेच जनजागृतीपर उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी केल्याबद्दल जिल्हा नियोजन कार्यालय, सोलापूर यांच्या वतीने हा पुरस्कार देण्यात आला. सदर पुरस्कार निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार तसेच सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी सौ. प्रीतम कुंटला यांच्या हस्ते मंडळाच्या पदाधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आला.

यावेळी मंडळाचे संस्थापक अध्यक्ष व नगरसेवक मेघनाथ येमूल, सचिव विवेकानंद महिंद्रकर, आप्पा गणपती युथ फाऊंडेशनचे अध्यक्ष महेश कोडम, तसेच हरीनिवास सोमा, अनिल व्हनमाने आणि लक्ष्मीकांत महिंद्रकर उपस्थित होते.

आप्पा गणपती प्रतिष्ठानच्या माध्यमातून दरवर्षी विविध सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि जनजागृतीपर उपक्रम राबविले जातात. या उपक्रमांची दखल घेत राज्य शासनाकडून मिळालेला हा सन्मान दाजी पेठ परिसरासाठी अभिमानाची बाब मानली जात आहे. मंडळाच्या या यशाबद्दल विविध स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे.

# विशेष सहाय्य योजनेतील दिव्यांग लाभार्थ्यांनी UDID व आधार कार्ड ३१ मार्च पूर्वी संलग्न करावे

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णय दिनांक १५ सप्टेंबर २०२५ अन्वये विशेष सहाय्य योजनेतील दिव्यांग लाभार्थ्यांना देण्यात येणारे मासिक अर्थसहाय्य रु.१५०० वरून रु.२५०० इतके वाढविण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. त्यानुसार संबंधित दिव्यांग लाभार्थ्यांना अर्थसहाय्याचे वितरण डीबीटी पोर्टलद्वारे थेट लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात करण्यात येत आहे.

याअनुषंगाने राज्य पुरस्कृत संजय गांधी निराधार योजना, वृद्ध व्यक्तीसाठी श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना तसेच केंद्र पुरस्कृत इंदिरा गांधी दिव्यांग निवृत्तीवेतन योजना अंतर्गत लाभ घेणाऱ्या दिव्यांग लाभार्थ्यांचे UDID कार्ड व आधार कार्ड दिनांक ३१ मार्च २०२६ पूर्वी संलग्न करणे बाबत सूचना प्राप्त झालेल्या आहेत.तरी सर्व संबंधित दिव्यांग लाभार्थ्यांनी शासनाच्या सूचनेनुसार आवश्यक कागदपत्रांसह दिनांक ३१ मार्च २०२६ पूर्वी कार्यालयाशी संपर्क साधून प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन संजय गांधी निराधार योजना शहर कार्यालयच्या तहसिलदार शिल्पा पाटील यांनी केले आहे. तसेच संजय गांधी शहर शाखा कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील विशेष सहाय्य योजनेतील सर्व दिव्यांग लाभार्थ्यांनी दिनांक ३१ मार्च २०२६ पूर्वी आपले वैश्विक ओळखपत्र (UDID Card) व आधार कार्ड संलग्न करणे आवश्यक आहे. यासाठी लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह संजय गांधी शहर शाखा कार्यालयाशी संपर्क साधावा.लाभार्थ्यांनी वैश्विक ओळखपत्र (UDID Card), आधार कार्ड, बँक पासबुक, अपंग प्रमाणपत्र, आधार लिंक असलेला मोबाईल क्रमांक कागदपत्रे बरोबर आणणे आवश्यक आहे. सदर कागदपत्रांसह संजय गांधी शहर शाखा कार्यालय, जुने जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर येथे संपर्क साधल्यास दिव्यांग लाभार्थ्यांचे UDID व आधार कार्ड संलग्न करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

# सिंहगड पब्लिक स्कूलमध्ये सिनियर केजी विद्यार्थ्यांचा 'ग्रॅज्युएशन डे' उत्साहात



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** येथील सिंहगड पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये बुधवारी (दि. ११ मार्च २०२६) सिनियर केजीच्या विद्यार्थ्यांचा ग्रॅज्युएशन डे उत्साहात साजरा करण्यात आला. लहानग्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासातील महत्त्वाचा टप्पा असलेल्या या कार्यक्रमाला पालक व शिक्षकांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाची सुरुवात स्वागतपर भाषणाने झाली. यानंतर विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. ग्रॅज्युएशन गाऊन व कॅप परिधान करून विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने मंचावर येत प्रमाणपत्रे स्वीकारली. हा क्षण पालक व शिक्षकांसाठी अभिमानाचा आणि भावनिक ठरला. या कार्यक्रमास सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळाचे सहसचिव तसेच सिंहगड इन्स्टिट्यूट, केगाव, सोलापूरचे कॅम्पस डायरेक्टर मा. संजय नवले हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देत परिश्रम, जिज्ञासा आणि आत्मविश्वासाच्या जोरावर प्रगती साधण्याचे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाला प्राचार्या शाहीन शेख, उपप्राचार्य प्रकाश नवले तसेच पर्यवेक्षिका सारिका चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. शाळेने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी घेतलेल्या प्रयत्नांचे पालकांनी कौतुक केले. कार्यक्रमाच्या शेवटी छायाचित्रण आणि आनंदाच्या वातावरणात हा सोहळा अविस्मरणीय ठरला.